स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 13–07–2012 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 12. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |
| 13. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |
| 2. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 3. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड सिद्यीकी, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 81 :—बाबा ताजुद्दीन दर्गाह, ताजाबाद येथील सुशोभिकरण व
सौंदर्यीकरणास्तव शासकीय विशेष अनुदानातंर्गत ताजाबाद येथे येणाऱ्या भाविकांसाठी सरायचे बांधकामास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६७३ दि. २४.०२.२००९ अन्वये मे. शायोना कार्पोरेशन, यांनी सादर केलेल्या रू. ७,२१,००,८४८/— रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्यात आली. उपलब्ध राशी रू. ३.०० कोटी रकमेचा कार्यादेश देण्यात आला असून कंत्राटदारास रू. २.९९ कोटी रकमेचे भुगतान केले आहे. शासनाकडून उर्वरित कामाचे अनुदान अद्याप अप्राप्त आहे. करिता प्रत्यक्षात झालेल्या कामाचे ( पूर्वी भुगतान केलेल्या कामा व्यतिरीक्त ) भूगतान करण्याचे दृष्टीने, उर्वरित निधी काम पूर्ण करण्याचे दृष्टीने व नवनिर्मित वास्तुचा उपयोग होण्यास्तव, उर्वरित निधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याने, म.न.पा. निधीतून उर्वरित कामास्तव अंदाजित रू. ५२२ लक्ष एवढा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.
शासनाकडे अनुदानास्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. निधी प्राप्त झाल्यास म.न.पा. निधीतून झालेला खर्च समायोजित करता येईल.

ठराव क्रमांक 82 :— नागपूर महानगरपालिकेच्या सिमेअंतर्गत नागपूर शहरात
दिनांक 16 मे 1966 चे अगोदर आयात झालेले शस्त्र जकात कार्यवाहीस ग्राहय न धरणे आणि त्यानंतर आयात झालेल्या शस्त्रांवर आयाकर्त्याकडून एकेरी चुंगीकर तसेच दहापट चुंगीकर वसूल करण्याकरिता मंजूरी प्रदान करण्याबाबत.
तसेच नागपूर म.न.पा. च्या सिमेअंतर्गत नागपूर शहरात बऱ्याच शस्त्राधारकांनी / आयातकर्त्यांनी शस्त्रे आयात केलेली आहेत. परंतु अशा आयात केलेला शस्त्रांवर जकात कर पटविलेला नसल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आलेले आहे. नागपूर महानगरपालिका सिमेत विक्री, उपयोग व उपभोगाकरीता आयात होणाऱ्या प्राणी आणि मालावर म.न.पा. अधिनियम 1948 चे कलम 114(1) (ई) च्या अंतर्गत जकात कर वसुली ही 1 जून 1966 पासून लागु करण्यात आलेली असल्याने, सदर्हु दिनांक अगोदर आयात झालेला माल जकात कार्यवाहीस ग्राहय धरणे उचित होणार नाही. परंतु तदनंतर आयात केलेल्या शस्त्रांवर सुध्दा चुंगीकर पटविलेला नसल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आलेले आहे. आयात करण्यात आलेल्या शस्त्रांवर शस्त्रधारकांकडून / आयातकर्त्यांकडून एकेरी चुंगीकर तसेच दहापट चुंगीकर वसूल करण्याकरिता निम्नलिखीत बाबींना मंजुरी प्रदान करण्याचा प्रस्ताव समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. दिनांक 1 जुन 1966 चे अगोदर नागपूर शहरात आयात झालेल्या शस्त्रांवर जकातकर कार्यवाहीस ग्राहय न धरणे.
2. सैन्यातून ( Military ) निवृत्त झालेल्या, पालीस सुरक्षा गार्ड, आर्डन्नस फॅक्ट्री, या कर्मचाऱ्यांनी स्वतःसाठी ( Ex Sarivice man) आयात केलेल्या शस्त्रांवर ऐकेरी जकात कर वसूल करणे म्हणजेच जकात नियम क्र. 46 चे अंतर्गत 10 पट

जकात करातून सुट ( Relaxation ) देणे.

3. जे शस्त्रधारक, जकात विभाग म.न.पा.च्या (जकात नियम क्र. 43) कार्यवाहीच्या अगोदरच स्वतःहून केंद्रीय जकात कार्यालयात दस्ताऐवजासह हजर होऊन शस्त्रावरील जकात कर भरण्यास तयार आहेत, अशा शस्त्रधारकांना जकात नियम क्र. 46– अ अंतर्गत दहापट जकात करातून सूट ( Relaxation ) देणे. व त्यांचे एकेरी जकात कर वसुल करणे.
4. ऑर्डन्नस फॅक्ट्री अंबाझरी नागपूर, यांना शस्त्राचे मुल्यनिर्धारण करवून देण्याबाबत विनंती पत्र देणे.
5. ज्या शस्त्रांचे खरेदी बाबतची कागदपत्रे नाहीत, किंवा गहाळ झालीत अशा शस्त्रांच्या बाबतीत ऑर्डन्नस फॅक्ट्री अंबाझरी नागपूर, यांचे कडून प्रमाणित केलेल्या शस्त्रांच्या किंमतीवरच दहापट जकात कर वसुल करणे.
6. अथवा नागपूर शहरातील Authorised's Dealar यांनी प्रमाणीत केलेल्या शस्त्रांच्या किंमतीवर दहापट जकात कर वसूल करणे.
7. म.न.पा. जकात विभाग अस्तित्वात आल्यानंतर म्हणजेच 1 जुन 1966 चे नंतर शहरात आयात झालेल्या शस्त्रांवर दहापट जकात कर वसूल करण्याची कार्यवाही करणे.
8. ज्या शस्त्रधारकांनी नागपूर शहरातील विक्रेत्यांकडून शस्त्रे खरेदी केलीत त्या विक्रेत्यांना आयातील शस्त्रावरील जकात कराची कागदपत्रे जकात नियम क्र.43 अन्वये मागविणे.
9. पोलीस आयुक्त यांचे कार्यालयास जकात कर भरल्याची पावती सादर केल्याशिवाय, परवान्याचे नूतनीकरण न करण्याबाबतची विनंती करणे.

ठराव क्रमांक 83 :– नागपूर महानगरपालिकेच्या ताजाबाद उर्दू माध्यमिक शाळेच्या 14 (चौदा) वर्गखोल्यांचे बांधकाम राजाबाळ चिटणीस हिंदी प्राथमिक शाळेच्या प्रांगणात करण्याकरिता वर्गखोल्या बांधकाम सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत निधीमधून एकुण रु. 56,00,000/– पर्यंत व उर्वरित रुपये म.न.पा. फंडातून खर्च करण्याकरिता असे एकंदर रु. 59,13,883/– च्या प्राकलन राशीच्या खर्चाचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यांस एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 84 :– नागपूर महानगरपालिकेतर्फे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत खरेदी करण्यात आलेली एकूण 240 स्टॅन्डर्ड बसेस करीता चे नागपूर महानगरपालिकेच्या फंडात जमा झालेले जकात कर चे रुपये 74,37,960/– नागपूर महानगरपालिकेचे बस खरेदी करण्या करीता चे बॅंक खात्या मध्ये वळती करणे आणि राज्य शासनाचे दिनांक 15.04.2010 च्या पत्राच्या अनुषंगाने व्हॅट कर ची रक्कम परतफेड करण्याबद्दल राज्य शासनास विनंती पत्र पाठविण्यास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

++ ++ ++

ठराव क्रमांक 85 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर